# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ९, १०, १२/२०१२-१३ दिनांक :

१) श्री. विजय यल्लाप्पा पुजारी ( तक्रार क्र. ९/१२-१३ )
मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली.
२) श्री. भिमाशंकर परमेश्वर बंडगर, (तक्रार क्र. १०/१२-१३ )
मु.पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली.
३) श्री. भाऊराया नामदेव चव्हाण, (तक्रार क्र. १२/१२-१३)
मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली

अर्जदार

## विरुध्द

१) कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,
सं व सु मंडळ कार्यालय, सांगली
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली
३) सहाय्यक अभियंता,
म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

विरुध्द पक्षकार

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या तिन्ही तक्रारी एकत्रित निकाली काढण्यात येत आहेत कारण की, त्या एकाच संख उप विभागातील असून प्रत्येक तक्रारीतील मागणी एकच आहे व वितरण कंपनीचा बचावही एकसारखाच आहे.

This document was created using SmartPDFCreator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

केस क्र.०९/१२-१३

श्री. विजय यल्लाप्पा पुजारी, मु.पो. सोन्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. १२.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ८१३ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १४.६.२०११ रोजी चलन रु. ५०००/- पावती क्र. ०२०४३९२ नुसार भरले व चाचणी अहवाल दि.३०.१२.२०११ रोजी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.१.२०१२ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत कुठलाही आदेश पारीत केला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - विद्युत सप्लाय कोड कलम ४.५ नुसार वीज जोडणी मिळावी व विलंबाबद्दल भरपाई मिळावी. अर्जासोबत चलन भरल्याची पावती व चाचणी अहवालाची प्रत जोडली आहे.

केस क्र १०/१२-१३

श्री. भिमाशंकर परमेश्वर बंडगर, मु.पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. १२.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. १०७/२ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. १२.११.२०१० रोजी चलन रु. ५०५०/- पावती क्र. ५३५१११ नुसार भरले व चाचणी अहवाल दि. २३.५.२०११ रोजी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.१.२०१२ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत कुठलाही आदेश पारीत केला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी मिळावी व विलंबाबद्दल भरपाई मिळावी. अर्जासोबत पैसे भरल्याची पावती व चाचणी अहवालाची प्रत जोडली आहे.

केस क्र १२/१२-१३

श्री. भाऊराया नामदेव चव्हाण, मु.पो. उटगी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. १२.४.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

तक्रारदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. ४७६ येथे ३ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २३.६.२०११ रोजी चलन रु. ५०५०/- पावती क्र. ५३५१११ नुसार भरले व चाचणी अहवाल त्याचदिवशी दिला. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.१.२०१२ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत कुठलाही आदेश पारीत केला नाही. मंचाकडून अपेक्षित मदत - वीज जोडणी मिळावी व विलंबाबद्दल कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी. अर्जासोबत पैसे भरल्याची पावतीची प्रत जोडली आहे.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

केस क्र. ९ मध्ये वि.प.ने आपल्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने दि. १४.६.२०११ रोजी नवीन शेतीपंप वीज जोडणीसाठी चलन भरल्याचे मान्य केले आहे. त्यांचे जेष्ठता नुसार आदेश देऊन काम करुन घेण्यात येत आहे. वितरण कंपनीकडे ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही. त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

केस क्र. १० मध्ये वि.प.ने आपल्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने दि. १२.११.२०१० रोजी नवीन शेतीपंप वीज जोडणीसाठी चलन भरल्याचे मान्य केले आहे.त्यांचे एकूण ०.४८ कि.मी. लघुदाब वाहिनी लागते त्यासाठी आठ पोल उभे करुन लघुदाब वाहिनी ओढून देण्याचे काम चालू आहे व लवकरच पूर्ण होईल. संख उप विभागांतर्गत बराचसा भाग हा दुर्गम असल्यामुळे काम झालेले नाही. कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही. त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

केस क्र. १२ मध्ये वि.प.ने आपल्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने दि. २३.६.२०११ रोजी नवीन शेतीपंप वीज जोडणीसाठी चलन भरल्याचे मान्य केले आहे. त्यांचे जेष्ठता नुसार आदेश देऊन काम करुन घेण्यात येत आहे. वितरण कंपनीकडे ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. कृती मानके विनियम २००५ कम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही. त्यामुळे नुकसान भरपाई मान्य करण्यात येवू नये असा बचाव घेतला.

प्रस्तुत तक्रारींची सुनावणी दि. ९.५.२०१२ ला मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर, प्रतिनिधी नेमले नाहीत. वि.प.तर्फे श्री. आर.बी. कदम, सहाय्यक अभियंता संख उप विभाग उपस्थित. वि.प.चे अधिकारी यांनी पेड पेंडीग केसेस बऱ्याच प्रमाणात असल्याने विद्युत पुरवठा देण्यास उशीर झाला आहे. तक्रार क्र. ९ - श्री. विजय यल्लाप्पा पुजारी, मु.पो. सोन्याळ यांना दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देणार, तक्रार क्र. १० - श्री. भिमाशंकर परमेश्वर बंडगर, मु.पो. हळ्ळी यांना Theft Drive कारवाईमध्ये कोटेशन दिले आहे, त्यांना दि. ३०.६.२०१२ पर्यंत वीज जोडणी देणार व तक्रार क्र. १२ - श्री. भाऊराया नामदेव चव्हाण, मु.पो. उटगी यांना दि. ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देणार असे सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) या तिन्ही तक्रारीमध्ये ग्राहकांनी मागणी केल्याप्रमाणे वीज जोडणी देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

२) ग्राहकांनी मागणी केल्याप्रमाणे कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांना नुकसान भरपाई मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर :होय

This document was created using Smart PDF creator. To remove this message purchase the product at www.SmartPDFcreator.com

## कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार या तिन्ही ग्राहकांनी चलन भरल्यानंतर चाचणी अहवाल दिलेले आहेत. वितरण वाहिनी विस्तार असल्याने कृती मानके विनियम २००५ अधिनियम ४.५ नुसार ३ महिन्यात विद्युत पुरवठा देणे वितरण कंपनीवर बंधनकारक आहे. कृती मानके मानकाची पूर्तता करण्यात वि.प. अपयशी ठरली आहे, त्यामुळे कृती मानके विनियम व त्यासोबतच्या परिशिष्ट अ नुसार विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई मंजूर करणे योग्य होईल. वि.प.च्या स्थानिक अधिकाऱ्यांनी लेखी अहवालात दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेला आहे अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत त्यामुळे प्रस्तुत ग्राहकांना जेष्ठतायादीनुसार विद्युत पुरवठा देण्यात येईल असे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु वि.प.च्या अंतर्गत व्यवस्थेनुसार काढलेल्या परिपत्रकामुळे कृती मानकांचे पालन झाले असे म्हणता येणार नाही किंवा कृती मानकांचे पालन करण्यात अपयश आल्यास भरपाई नामंजूर करता येणार नाही. कृती मानके विनियमातील तरतुदींचे पालन करणे वि.प.ची जबाबदारी आहे व ग्राहकाचा तो हक्क आहे. तसेच ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश मंच देऊ शकतो. वि.प.च्या स्थानिक अधिकाऱ्यांनी केस क्र.९ मध्ये ३०.७.२०१२, केस क्र. १० मध्ये ३०.६.२०१२ व केस क्र.१२ मध्ये ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देतो असे मंचासमोर सांगितले आहे. मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. खालील प्रमाणेआदेश -

## आदेश

१) या तिन्ही तक्रारी मंजूर करण्यात येत आहेत.

२) वितरण कंपनी संख उप विभाग यांनी केस क्र.९ मध्ये ३०.७.२०१२, केस क्र. १० मध्ये ३०.६.२०१२ व केस क्र.१२ मध्ये ३०.७.२०१२ पर्यंत वीज जोडणी देवून विद्युत पुरवठा करावा व त्याचा अहवाल मंचास सादर करावा.

३) वितरण कंपनी संख उप विभाग यांनी या तिन्ही तक्रारदार ग्राहकांना कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार चाचणी अहवाल दिल्याच्या तारखेपासून ३ महिन्या नंतरच्या कालावधीतील विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे भरपाई द्यावी. सदर रकमेचे समायोजन दोन बिलींग सायकलमध्ये करुन उर्वरित रक्कम ग्राहकाला रोखीने द्यावी. त्याचा अहवाल मंचास द्यावा.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com